लोकमंगल विज्ञान महाविद्यालयाची दुधपंढरीला भेट

वडाळा येथील लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयाच्या जैवतंत्रज्ञान विभागाची शैक्षणिक सहल दिनांक 29 मे 2023 रोजी केगाव येथील दूध पंढरी या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. यावेळी महाविद्यालयातील तीन प्राध्यापक व 45 विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी दूध पंढरी प्रकल्पामधील, विविध प्रकारची उत्पादने, मायक्रोबायोलॉजी लॅबोरेटरी, पाश्चरायझेशन युनिट व क्वालिटी कंट्रोल युनिट यास भेट देऊन त्या ठिकाणी चालणाऱ्या प्रक्रिया, उत्पादन, पॅकिंग, वितरण व्यवस्था आधी घटकांचा बारकाईने अभ्यास केला.यावेळी दूध पंढरीचे श्री काळे सर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या शैक्षणिक सहलीसाठी मार्गदर्शक प्राचार्य डॉ सतीशकुमार देवकर सर, विभागाचे प्रमुख डॉ किरण जगताप, प्रा अंकुश गोरट्याल यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या सहलीसाठी प्रा कविता संभारम, प्रा विनय सामलेटी व प्रा अमृता नन्नवरे यांनी परिश्रम घेतले.







